CNR.NO. MHPU260049112024

**कौ.हि.म.सं. क्र. ६७/२०२४ मध्ये**
**निशाणी क्रमांक ०५ वर अंतरीम पोटगीचा आदेश**
**सुप्रिया माळी वि. दत्तात्रय खामकर.**
**(दिनांक–०५/०८/२०२३)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी त्यांच्याकरीता व त्यांच्या मुलांकरीता प्रकरणाचा अंतिम निकाल लागे पावेतो गैरअर्जदार क्र. ०१ यांच्याकडून अंतरीम पोटगी प्रति माह रुपये ४०,०००/– (अक्षरी–रुपये चाळीस हजार) मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२**. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार यांचा विवाह गैरअर्जदार क्र. ०१ यांच्यासोबत दिनांक ०८/०१/२०१३ रोजी कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर येथे संपन्न झाला. लग्नातील संपुर्ण खर्च हे अर्जदार यांच्या वडीलांनी लग्नातील मंडळीचा मानपान करुन केला होता. लग्नानंतर अर्जदार व गैरअर्जदार हे ऑर्डीनन्स फॅक्टरी, देहुरोड, पुणे येथे राहण्यास आलेत. अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्नसंबंधातुन त्यांना दोन अपत्य नामे पार्थ व नित्या जन्मली.

**०३.** अर्जदार यांचे पुढे कथन असे की, लग्न जमल्यानंतर लगेचच गैरअर्जदार क्र. ०१ हे त्यांच्यावर विनाकारण संशय घेत होते. लग्नानंतर गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार यांच्या वडीलांना गॅस सिलेंडर खरेदी करण्याकरीता रक्कम रु.७,०००/– मागणी केली व रक्कम न दिल्यास तुमच्या मुलीला चुलीवर स्वयंपाक करावे लागेल अशी धमकी दिली. त्यानंतर देखील गैरअर्जदार क्र. ०१ हे अर्जदार यांच्या वडीलांना वारंवार पैशांची मागणी करत होते. तसेच, पैसे न दिल्यास अर्जदार हिस नांदवणार नाही अशी धमकी देत होते. त्यानंतर सर्वच गैरअर्जदार हे अर्जदार हिस सतत टोचून बोलून त्रास देत होते. त्याचप्रमाणे अर्जदार यांना गैरअर्जदार यांची आई 'तुला स्वयंपाक येत नाही, बघताना हेकणी बघतेस, साडी घालत नाही, कुंकु लावत नाही' असे म्हणून त्रास देत होते. जर अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचे म्हणण्याप्रमाणे ऐकले नाही, तर सर्व गैरअर्जदार हे त्यांना मोठ मोठयाने बोलून दमदाटी करत होते.

त्यामुळे अर्जदार यांना खुप शारिरिक व मानसिक त्रास होत होता. तसेच गैरअर्जदार हे अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेत असे व त्यांना दारु पिण्याचे व्यसन असल्याने ते दारु पिवून घरी येवून अर्जदार व मुलांना शिवीगाळ करुन मारहाण करत असे. त्यामुळे देखील अर्जदार यांना मानसिक त्रास होत होता. गैरअर्जदार यांनी त्यांच्या वडीलांना फलॅट खरेदी करण्याकरीता व घरातील फर्नीचरचे काम करण्याकरीता रु. १ लाखाची मागणी केली होती. सदर मागणी अर्जदार यांच्या वडीलांनी प्रेमापोटी पुर्ण केलेली होती. तरी देखील गैरअर्जदार क्र. ०१ हे अर्जदार व त्यांच्या मुलांना शिवीगाळ करुन त्रास देत होते.

**०४.** अर्जदार यांनी पुढे कथन केले की, दि. २१/०५/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी त्यांना शिवीगाळ करुन, जीवे ठार मारण्याची धमकी देवून, मारहाण केली. करीता, अर्जदार यांनी पोलीस स्टेशन, देहुरोड येथे घटनेची लेखी तक्रार दाखल केली. त्यामुळे सर्व गैरअर्जदार यांनी त्यांना मुलांसहीत घराबाहेर हाकलुन दिले व तेव्हापासून अर्जदार ही त्यांच्या मुलांसोबत देहुरोड येथे विभक्त कुटुंबात राहत आहे. याउलट, गैरअर्जदार क्र. ०१ हे ऑर्डीनन्स फॅक्टरी, देहुरोड येथे अॅडमिन या पदावर केंद्र सरकारच्या सेवेत कार्यरत असून त्यांना प्रति माह रक्कम रु. ८०,०००/– इतका वेतन मिळते. त्यामुळे अर्जदार व त्यांच्या मुलांच्या उदर निर्वाह, औषोधोपचार, कपडेलत्ते व दैंनदिन गरजा भागवण्याकरीता गैरअर्जदार क्र. ०१ यांच्याकडून प्रस्तुतचे प्रकरण निकाली लागे पावेतो अर्ज दाखल केल्याच्या तारखे पासून प्रति माह रक्कम रुपये ४०,०००/–(अक्षरी–रुपये चाळीस हजार) अंतरीम पोटगी मिळण्याची विनंती केलेली आहे.

**०५.** प्रस्तुत अर्जास गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जदार यांच्या अर्जातील परिच्छेद क्र. ०१ व ०२ व्यतिरिक्त् इतर संपुर्ण कथने नाकारलेली आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यात कथन केले की, गैरअर्जदार यांचे पाहुणे त्यांच्या घरी आल्याचे अर्जदार हिस आवडत नव्हते. त्यामुळे त्या त्यांच्या पाहुण्यांना तुच्छतेची वागणुक देवून त्यांचा अपमान करीत

असे. त्यामुळे गैरअर्जदार यांच्या पाहुण्यांनी त्यांच्या घरी येणे बंद केले होते. तसेच, अर्जदार हया गैरअर्जदार क्र. ०२ यांना वाईट वागणुक देवून शारिरिक व मानसिक त्रास देत होत्या व गैरअर्जदार क्र. ०१ यांना धमकी देत असे की, ''तुम्ही तुमच्या आईला गावाला नेवून सोडा अन्यथा मला तुमच्या सोबत संसार करावयाचा नाही''. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी त्यांच्या आईस मुळ गावी सोडुन विभक्त कुटुंबामध्ये राहण्यास नकार दिला असता, अर्जदार ही कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नसताना स्वेच्छेने घर सोडुन निघुन गेल्या आहे. गैरअर्जदार यांचे पुढील कथन असे की, अर्जदार या सुशिक्षीत असून जगदगुरु इंग्लीश मीडीयम स्कुल, देहू या ठिकाणी पुर्णवेळ शिक्षीका म्हणुन कार्यरत आहे व त्यांना प्रति माह रक्कम रु. २५,०००/– ते ३०,०००/– इतके वेतन मिळते. अर्जदार हया गैरअर्जदार यांच्यापासून विभक्त राहत असल्या तरीही गैरअर्जदार यांच्या कडुन त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची फी, शैक्षणीक साहीत्य व टयुशन फी या सर्वांसाठी त्यांना खर्च करण्यास भाग पाडत आहे. तसेच, गैरअर्जदार यांच्या ओळखीच्या किराणा दुकानातून घर खर्चासाठी लागणारे सर्व साहित्य खरेदी करत असून त्याचा बिल देखील गैरअर्जदार यांना भरण्यास भाग पाडत आहे. गैरअर्जदार क्र. ०१ हे ऑर्डनन्स फॅक्टरी, देहूरोड येथे नोकरी करीत असून त्यांना रक्कम रु. ४०,०००/– इतका पगार मिळतो. अर्जदार या विनाकारण गैरअर्जदार क्र. ०१ पासून विभक्त राहत आहे. गैरअर्जदार यांना संसार सुखापासून वंचीत ठेवत आहे. तसेच, मुलांना देखील पितृसुखापासून वंचीत ठेवत आहे. सदरचा अर्ज दाखल करण्याकरीता कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नाही. अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना आर्थिक व मानसिक त्रास देण्याच्या हेतूने खोटा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. ०१ यांनी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**०६.** अर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादा दरम्यान नि.क्रं.०१ मधील त्यांच्या अर्जातील संपूर्ण मजकूर अधोरेखांकित केलेला आहे आणि शेवटी अर्जदार यांना प्रस्तुत प्रकरणाचा निकाल लागेपावेतो गैरअर्जदार क्र.०१ यांच्याकडून अंतरीम खावटी म्हणून

अर्जदार यांना प्रति माह रुपये ४०,०००/–(अक्षरी–रुपये चाळीस हजार) अंतरीम पोटगी मिळण्याची विनंती केलेली आहे.

**०७.** गैरअर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यामध्ये त्यांनी कथन केले की, गैरअर्जदार यांचे पाहुणे त्यांच्या घरी आल्याचे अर्जदार यांना आवडत नव्हते व त्या त्यांच्या पाहुण्यांना तुच्छतेची वागणुक देवून त्यांचा अपमान करीत असे. त्यामुळे गैरअर्जदार यांच्या पाहुण्यांनी त्यांच्या घरी येणे बंद केले होते. तसेच अर्जदार हया गैरअर्जदार क्र. ०२ यांना वाईट वागणुक देवून शारिरिक व मानसिक त्रास देत होत्या. अर्जदार हया विनाकारण गैरअर्जदार क्र. ०१ पासून विभक्त राहत आहे. गैरअर्जदार यांना संसार सुखापासून वंचीत ठेवत आहे. तसेच मुलांना देखील पितृसुखापासून वंचीत ठेवत आहे. अर्जदार यांनी केवळ त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. शेवटी, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**०८.** मी अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ यांचा दिनांक ०८/०१/२०१३ रोजी कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर येथे संपन्न झाला. त्यानंतर अर्जदार हे नांदण्याकरिता गैरअर्जदार क्र.०१ यांच्याकडे तिचे सासरी गेली. तेथे ती गैरअर्जदार क्र.०१ यांच्या राहत होती. अर्जदार व गैरअर्जदार यांना आपसी नातेसंबंध असलयाने मान्य केलेले आहे. तसेच अर्जदार यांना गैरअर्जदार यांच्यापासून दोन अपत्य नामे पार्थ व नित्या ही जन्मलेली आहेत. अर्जदार यांच्या कथनांनुसार दि. २१/०५/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी त्यांना शिवीगाळ करुन, जिवे ठार मारण्याची धमकी देवून, मारहाण केली. त्यामुळे अर्जदार यांनी देहुरोड येथे लेखी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या तोंडी कथनास कागदोपत्री पुराव्यावरुन सकृतदर्शनी बळकटी मिळते व अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये आपसी वाद असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार यांच्या कथनानुसार गैरअर्जदार यांनी त्यांना मुलांसोबत घरा बाहेर हाकलुन दिले व तेव्हापासून अर्जदार ही त्यांच्या मुलांसोबत देहुरोड येथे नाईलाजास्तव विभक्त राहत आहे.

गैरअर्जदार क्र. ०१ हे ऑर्डीनन्स फॅक्टरी, देहूरोड येथे अडमिन म्हणुन कार्यरत असून त्यांना रक्कम रु. ८०,०००/– प्रति महा इतके वेतन मिळते. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो स्वतःकरीता व मुलांकरीता रक्कम रु. ४०,०००/– ची मागणी केली. याउलट गैरअर्जदार यांनी अर्जदार ही मुलांसोबत कोणतेही संयुक्तीक कारण नसताना देहुरोड येथे विभक्त राहत असल्याचे कथन करुन त्यांना पितृसुखापासून वंचीत ठेवत आहे. तसेच अर्जदार या जगदगुरु इंग्लीश मीडीयम स्कुल, देहू येथे नोकरी करते व त्यामधुन त्यांना रु. २५,०००/– ते ३०,०००/– मासीक वेतन मिळते. याठिकाणी नमुद करणे क्रमप्राप्त आहे की, सामान्यतः कोणतीही भारतीय स्त्री तीचे लग्न झाल्यानंतर पतीचे घर सोडून माहेरी कोणतेही कारण नसतांना स्वेच्छेने आश्रयाने जावून राहत नाही. तिला जर तिच्या पतीकडून त्रास झाला असेल तर तो सहन करुन देखील ही पतीकडेच राहणे पसंत करते. परंतू, पती अथवा त्यांचे कुटूंबीय यांच्याकडून होणारा त्रास असहय असेल तर केवळ नाईलाजास्तव तिला तिचे घर सोडून अपरिहार्याने तिच्या नातेवाईकांकडे अथवा माहेरी अथवा विभक्त आश्रयीत व्हावे लागते. त्यामुळे अर्जदार यांच्या कथनास सकृतदर्शनी बळकटी मिळते.

**०९**. एकंदरीत अभिलेखावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार ही आज रोजी देहुरोड येथे फ्लॅट घेवून मुलांसोबत विभक्त राहत आहे. अर्जदार यांच्या उत्पन्न व दायीत्व प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अर्जदार यांनी नमुद केले की, त्या खाजगी शिक्षण संस्थेत सेवेत असून त्यांना रक्कम रु. १६,५००/– दरमहा वेतन मिळते. तसेच, अर्जदार यांनी अभिलेखावर त्यांनी नोकरी सोडल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यामुळे सदर प्रमाणपत्राचे बारकाईने अवलोकन केले असता, ते नोकरी सोडल्याचे प्रमाणपत्र नसुन अनुभव प्रमाणपत्र असल्याचे आढळ होते. सबब आज रोजी अर्जदार हया कमवीत्या नाहीत व त्यांना स्वतंत्र उत्पन्न नाही अथवा उत्पन्न मिळवीण्याची क्षमता /पात्रता नाही असे अनुमान काढता येणार नाही. तसेच, गैरअर्जदार क्र.०१ यांच्या उत्पन्नाचे कोणतेही अभिलेख अर्जदार यांनी दाखल केलेले नाही. परंतु गैरअर्जदार क्र. ०१ यांनी त्यांच्या उत्पन्न व दायीत्वाच्या प्रमाणपत्रामध्ये स्वतः नमुद केले आहे की, ते

ऑर्डीनन्स फॅक्टरी, देहुरोड येथे नोकरीस असून त्यांना रक्कम रु. ७७,५९३/– इतके वेतन मिळत असल्याचे व खर्च वजा जाता रु. १५,८१९/– मिळत असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदार क्र. ०१ यांना जरी त्यांनी घेतलेले कर्ज व खर्चापोटी वेतनामधील रक्कम कपात होत असेल आणि त्यांना रु. १५,८१९/– वेतन मिळत असले तरी तरी ते त्यांना मिळणारे मुळ वेतनावर पोटगी देणे बांधील आहेत. केवळ गैरअर्जदार यांना कर्जाचे हप्ते व त्यांच्या आईस सांभाळण्याचा खर्च असल्याने ते त्यांची जबाबदारी टाळू शकणार नाहीत. गैरअर्जदार यांच्या राहणीमानाप्रमाणे अर्जदार व त्यांच्या मुलांना राहण्याचा अधिकार आहे. अर्जदार यांचे नोकरीतून उत्पन्न विचारात घेता त्यांच्या मुलांना व जिवनमानाचा दैनंदिन खर्च त्यामधुन भागवू शकत नाहीत. सबब, गैरअर्जदार क्र.०१ हे अर्जदार यांचे पती व पार्थ व नित्या ही त्यांची आपत्य असल्याने त्यांचा सांभाळ करण्याची नैतिक व संविधानीक जबाबदारी गैरअर्जदार क्र.०१ यांच्यावर असून तो ती नाकारु शकत नाही. त्यामुळे निश्चितच गैरअर्जदार क्र.०१ यांना केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या ऑर्डीनन्स फॅक्टरी देहुरोड येथील नोकरीतून उत्पन्न मिळते. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यास कालावधी लागणार असल्यामुळे अर्जदार ही कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे. तसेच गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज प्रलंबीत असताना अर्जदार यांच्यावर कोणत्याही प्रकारे कौटुंबीक हिंसाचार करु नये असा आदेश पारित करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.०१ यांचे एकंदरीत उत्पन्न, राहणीमानाचा दर्जा विचारात घेता अर्जदार ही स्वतःकरीता व मुलांकरीता गैरअर्जदार क्र.०१ यांच्याकडून प्रति माह रुपये १५,०००/– (अक्षरी–पंधरा हजार पाचशे) अंतरीम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून आदेशीत करणे न्यायोचीत होईल. करीता, वरील विवंचनेवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

०१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. गैरअर्जदार क्र.०१ यांनी अर्जदारास प्रति माह रुपये

१५,०००/– (अक्षरी–रुपये पंधरा हजार) अंतरीम पोटगी म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून म्हणजेच दि. २७/०९/२०२४ रोजीपासुन दयावेत.

०३. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज प्रलंबीत असताना अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे कौटुंबीक हिंसाचार करु नये.

ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Digitally signed by ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Date: 2026.02.06 10:54:23 +0530

**(अभय म. विभुते),**
सह न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
वडगांव मावळ, पुणे.

दिनांक : ०४/०२/२०२६.
ठिकाण : वडगांव मावळ, पुणे.